# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Commerce

## Assignment

## Session: 2019 – 2020

Page No:- 
Date :- / /

2019-2020

Tanushree Yogiraj Barsagade

B.com (VI sem) III rd Year

Industrial Law (Home Assigment)

Yashoda Girl's Arts & Commerce College 2019-2020

SEAL

Principal
Yashoda Girls Arts & Commerce College, Nagpur-15

Page No:-
Date :-

Q.1 श्रमिकांच्या कल्याणासंबंधी कायद्यातील तरतूदी सांगा.

→ श्रमिकांच्या कल्याणासंबंधी (Provisions Releting to welfare of Labour)

श्रमिकांच्या कल्याणासंबंधी निर्माणी अधिनियमात (कलम 42 ते 43) खालील तरतूदी करण्यात आल्या आहेत.

① स्नान व धुण्याच्या सोई (washing facilities)
स्त्री व पुरुष श्रमिक यांच्याकरिता स्वतंत्र स्नानगृहे नसेप हातपाय व कपडे धुण्यासाठी पर्याप्त व्यवस्था प्रत्येक कारखान्यात उपलब्ध असाव्यात.

② कपडे ठेवण्याची व वाळविण्याची व्यवस्था
कामाच्या वेळी न वापरण्याचे कपडे ठेवण्यासाठी व ओले कपडे वाळविण्यासाठी योग्य जागा व साधनांची व्यवस्था करण्यात यावी.

③ बसण्याची सोय
उभे राहून काम करणाऱ्या कामगारांना मधून मधून विश्रांती

Page No:-
Date :- / /

घेण्यासाठी बसण्याची व्यवस्था तसेच बसून काम करणे शक्य असल्यास सर्व कामगारांसाठी तशी व्यवस्था केली पाहिजे.

④ प्रथमोपचार साधने

प्रत्येक कारखान्यात प्रथमोपचाराच्या निर्धारित साधनांनी युक्त प्रथमोपचार पेट्या सहज उपलब्ध असल्या पाहिजेत. प्रथमोपचार पेट्यांची संख्या 150 कामगारांमागे एक या प्रमाणात असावी. 500 पेक्षा जास्त कामगार असतील तर स्वतंत्र शुश्रूषा कक्ष व त्यातील तज्ञ कर्मचारी असावेत.

⑤ उपाहारगृह

250 पेक्षा अधिक कामगार असतील तर स्वतंत्र उपाहारगृह मालकाने चालवावे. यासाठी सरकार आदेश देऊ शकेल.

⑥ विश्रांतिस्थान व अल्पाहार कक्ष

150 पेक्षा अधिक कामगार असलेल्या कारखान्यात श्रमिकांसाठी स्वतंत्र व सुसज्ज विश्रांति कक्ष व मध्यान्ह सुटीत

न्याहारी घेण्यासाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था असावी.

(7) शिशुगृहे

50 पेक्षा अधिक स्त्री कामगार तर असतील तर अशा निर्माणीत स्त्री कामगारांच्या 6 वर्षाखालील बालकांसाठी सुसज्ज शिशुगृहे असणे आवश्यक आहे.

(8) श्रम कल्याण अधिकारी

ज्या निर्माणीत 500 किंवा त्याहून जास्त श्रमिक असतील त्या निर्माणीत श्रम कल्याण अधिकारी नियुक्त करण्याची जबाबदारी मालकावर राहील.

Page No:-
Date :- / /

Q.2. श्रमिकांच्या सुरक्षेसंबंधी कायद्यात तरतुदी आहेत ?

Ans => श्रमिकांच्या सुरक्षितते संबंधी (Provisions relating to Safety of workers).

श्रमिकांना कोणत्याही प्रकारे शारिरीक इजा होऊ नये व त्यांच्या जीविताच्या धोका उत्पन्न होऊ नये. यासाठी निर्माणी अधिनियमात खालील तरतूदी करण्यात आल्या आहेत.
(कलम 21 ते 41).

① यंत्राभोवती संरक्षण कुंपण योग्य
यंत्राभोवती संरक्षण कुंपण योग्य स्थितीत असावे.

② गतिमान यंत्रावर काम.

गतिमान यंत्रावर काम करीत असताना त्यापासून पुरेसे अंतर राखले जावे श्रमिकाने तंग कपडे वापरावे. स्त्री श्रमिक व बालकांना गतिमान यंत्राजवळ कोणत्याही प्रकारचे काम देता येणार नाही.

Page No:-
Date :- /

③ धोकायुक्त यंत्रावर कामाचे प्रशिक्षण

धोकायुक्त यंत्रावर काम करणाऱ्या श्रमिकाला त्या यंत्राविषयी संपूर्ण ज्ञान दिले पाहिजे. सावधगिरीबाबत पूर्ण प्रशिक्षण झालेल्या व्यक्तीलाच अशा यंत्राजवळ काम देता येईल. बाल व युवक श्रमिकांना धोकादायक यंत्रावर काम देता येणार नाही.

④ शक्तिचा संबंध तोडणारी साधने

ही प्रत्येक खोलीत असली पाहिजेत व आणीबाणीच्या प्रसंगी त्याच्या उपयोगासंबंधी स्पष्ट सूचना असाव्यात.

⑤ नविन यंत्रसामग्री

नविन यंत्रसामग्री लावत असताना त्यांची बांधवणी अत्यंत काळजीच्या प्रसंगी त्याच्या उपयोगासंबंधी केली पाहिजे. व यंत्राच्या धोकादायक भागावर आवरण असले पाहिजे.

Page No:- 8
Date :- / /

⑥ कॉटन ओपनर

कॉटन ओपनर प्रेसिंगसाठी उपयोगात येणाऱ्या कॉटन ओपनरजवळात स्त्री व बाल श्रमिकानां काम देता येणार नाही.

⑦ क्रेन व लिफ्टस

अवजड वस्तू उचलण्यासाठी व स्थानांतरीत करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या क्रेनस व लिफ्ट उत्तम स्थितीत असावे व योग्य व्यक्तीकडून त्यांची महिन्यांनी तपासणी होणे अनिवार्य आहे.

⑧ चक्राकार फिरणाऱ्या यंत्रासंबंधी

सर्व माहिती फलकावर लिखित असावी.

⑨ कारशी

जिने इत्यादी साधने मजबूत असावी.

⑩ अत्याधिक वजन

कोणत्याही श्रमिकांकडून त्याला इजा पोहचेल इतके

जास्त वजन उपलब्ध्यास अनुमती देण्यात येऊ नये.

(11) डोळ्यांचे संरक्षण

डोळ्यांचे संरक्षणासाठी आवश्यक तेथे योग्य साधने उपलब्ध असावीत.

(12) अग्निशामक व्यवस्था

कारखाण्यात आग लागल्यास आग विझविण्यासाठी व आगीतून सुटका करून घेण्यासाठी आवश्यक सर्व साधने सदैव सुसज्ज ठेवली पाहिजेत.

(13) इमारत व यंत्रसामग्रीची तपासणी

इमारती व यंत्रसामग्रीची वारंवार व्हावी. त्याची अवस्था धोकादायक आहे असे आढळल्यास त्यांच्या उपयोगावर बंदी घालण्यात येईल.

Page No:-
Date :- / /

Q.3 किसान मजूरी कायद्यातील खालील संज्ञांचा अर्थ स्पष्ट करा.

Ans ⇒ ① मालक / सेवायोजन
② सक्षम अधिकारी
③ मजूरी
④ अनुसूचित उद्योग
⑤ कर्मचारी

① मालक / सेवायोजक (Employer)

अनुसुचित उद्योगांमध्ये प्रत्यक्षपणे किंवा दुसऱ्या व्यक्तीमार्फत जी व्यक्ति एक किंवा अधिक व्यक्तींची नेमणूक करते तेव्हा तिला मालक म्हटले जाईल. ठेकेदारामार्फत कामगारांची नेमणूक केली असल्यास ठेकेदार हा मालक ठरेल.

मालक या संज्ञेत पुढील व्यक्तिदेखील समाविष्ट होतात.

(i) ज्या ठिकाणी अनुसूचित उद्योग किंवा व्यवसाय चालतो त्या कारखान्याचा व्यवस्थापक.

(ii) केंद्र सरकारच्या किंवा स्थानिक संस्थेच्या अनुसुचित उद्योगांमध्ये

कर्मचाऱ्यावर देख रेख व नियंत्रण ठेवण्यासाठी नेमलेला अधिकारी खाते प्रमुख किंवा कर्मचारी अधिकारी.

(iii) इतर अनुसुचित उद्योगांमध्ये कर्मचाऱ्यांवर देखरेख व नियंत्रण करणारा अधिकारी किंवा त्यांना मजुरी देण्याची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यावर आहे असा मालकाचा जबाबदार असणारा अधिकारी.

② सक्षम अधिकारी

अनुसुचित उद्योगांमधील कर्मचाऱ्यांसाठी रहणीमान निर्देशांक तयार करण्यासाठी शासकीय राजपत्रात तशी सूचना देऊन वेळोवेळी योग्य सरकारने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यास सक्षम अधिकारी असे म्हणतात.

⑤ मजूरी (भृती) wage

कामाच्या करारातील अटी पूर्ण केल्यानंतर कर्मचाऱ्याला त्याच्या कामाबद्दल जो मोबदला मिळावयास पाहिजे आणि जो रोख रकमेत व्यक्त केला जाऊ शकतो. अशा मोबदल्यास मजूरी असे म्हणतात.

Page No:-
Date :- / /

मजूरीत फक्त घरभाडे भत्याचा समावेश होतो. परंतु त्यात खालील बाबींचा समावेश होत नाही.

(i) कर्मचाऱ्याला निवासासाठी दिलेल्या घराच्या सवलतीचे किंवा त्याला पुरविलेल्या वीज, पाणी व वैद्यकीय मदत या सवलतींचे मूल्य

(ii) मजूरीत समाविष्ट करू नये असे योग्य सरकारने जाहीर केलेल्या आणि कर्मचाऱ्याला पुरविलेल्या इतर सेवा आणि सवलतींचे मूल्य.

(iii) कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्ती निधीला भविष्य निर्वाह किंवा सामाजिक विम्याच्या कोणत्याही योजनेला मालकाने दिलेले अंशदान.

(iv) कोणताही प्रवास भत्ता किंवा प्रवास सवलतीचे मूल्य.

(v) आपले काम करताना कर्मचाऱ्याला जो विशेष खर्च करावा लागला असेल, त्या बद्दल मालकाने त्याला दिलेली रक्कम.

Page No:-
Date :-

(vi) नोकरीतून मुक्त होताना कामगारांना मिळणारी ग्रॅच्युईटी.

(4) अनुसुचित उदयोग

प्रस्तुत कायदयात दिलेल्या सूची क्रमांक आणि
① सूची
② मध्ये निर्देशित केलेल्या उदयोगांना अनुसुचित उदयोग असे म्हणतात. हा कायदा केवळ अनुसुचित उदयोगांनाच लागू होतो ही सूची पुढीलप्रमाणे आहे.

सुची (भाग) 1

① चोकरीचे गालिचे किंवा शाली तयार करणारे उदयोग
② धान, कनिक आणी डाळ यांच्या गिरण्या
③ तंबाखूनी संबधित व्यवसाय आणि बिडी कारखाने.
④ चहा, कॉफी, रबर आणी सिंकोना यांचे मळे
⑤ तेल गिरण्या
⑥ स्थानिक संस्थांमार्फत होणारी कामे
⑦ रस्ते किंवा इतर बांधकामाची आणी त्यांच्या दुरूसतीची कामे
⑧ दगड - फोडणे दगडांचा चूरा करणे ई कामे.

Page No:- 25
Date :- / /

(9) लाखेचे कारखाने
(10) अभ्रकांचे कारखाने
(11) सार्वजनिक मोटार वाहतूक
(12) चामडी कमविणे आणि कातडी तयार करण्याचे कारखाने.

## भाग (2)

(1) शेतीविषयक सर्व कामे.
(2) दुग्ध व्यवसाय
(3) बगिच्यातील उत्पादनासंबंधी सर्व कामे
(4) पशुपालन
(5) कुक्कुटपालन
(6) मधुमक्षिका पालन
(7) झाडे लावणे आणि तोडणे यासंबंधीचे व्यवसाय
(8) शेतमालाचे उत्पादन, वाहतूक विपणन या कार्यांशी संबंधित सर्व व्यवसाय

## (5) कर्मचारी (Employee)

अनुसुचित उद्योगांपैकी कोणत्याही उद्योगात कौशल्याचे किंवा बिना कौशल्याचे किंवा श्रमाचे किंवा कारकुनी स्वरूपाचे असे

Page No:-
Date :-

कोणतेही काम मोबदल्यासह करण्यासाठी ज्या व्यक्तीची नेमणूक झाली असेल त्या व्यक्तीला कर्मचारी असे म्हणतात कर्मचाऱ्यांमध्ये पुढील व्यक्तींचाही समावेश होतो —

(i) मुखादया व्यक्तीने आपल्या व्यापार व्यवसायाच्या हेतूने विक्री करण्याच्या हेतूने आपल्या वस्तू किंवा माल दुसऱ्या व्यक्तीच्या घरी किंवा इतर जागेत स्वच्छ करण्यासाठी बदल करण्यासाठी अलंकृत करण्यासाठी दुरुस्ती जोडणे इत्यादी प्रक्रिया करण्यासाठी किंवा पूर्ण करण्यासाठी दिल्या असतील तर ती दुसरी व्यक्ती सुद्धा समजली जाते तिला बाह्य कर्मचारी out worker असे म्हणतात.

(ii) योग्य सरकारने कर्मचारी म्हणून घोषित केलेले व्यक्ती.

Page No:-
Date :- / /

Q. 4 भारतीय निर्मिती अधिनियमानुसार कारखान्याची व्याख्या स्पष्ट करा.

Ans ⇒ निर्मिती (कारखाना) ची व्याख्या -

(1) ज्या इमारतीत किंवा तिच्या प्रांगणात 10 अथवा त्याहून अधिक श्रमिक कामावर आहेत किंवा गेल्या 12 महिन्यात कोणत्याही कार्यदिवशी कामावर होते आणि ज्या ठिकाणी उत्पादन क्रियेसाठी कोणत्याही भागात यांत्रिक शक्तीचा उपयोग केला जातो किंवा सर्वसाधारण शक्तीचा उपयोग करण्यात येतो असेच

(ii) ज्या परिसरातील उत्पादन कार्यात यांत्रिक शक्तीचा उपयोग केला जात नाही व गेल्या 12 महिन्यांच्या काळात कोणत्याही कार्यदिवशी 20 किंवा त्याहून जास्त श्रमिक कामावर होते. अशा ठिकाणाला निर्मिती किंवा कारखाना म्हणतात. वरील व्याख्येवरून कोणत्याही ठिकाणाला कारखाना ठरविण्यासाठी खालील अटी पूर्ण झाल्या पाहिजेत.

Page No:-
Date :-

(1) उत्पादन कार्य

त्या परिसरात उत्पादन कार्य चालू असले पाहिजे वस्तू तयार करणे जीर्णोद्धार परिवर्तन इत्यादी कार्याना उत्पादन मानले जाते.

श्रमिकांची संख्या

उत्पादन प्रक्रियेत विशिष्ट दिवशी किंवा त्यापूर्वीच्या कालावधीत कोणत्याही कार्य दिवशी जर उत्पादनासाठी यांत्रीक शक्तिचा वापर केला जात असेल तर 10 किंवा त्याहून जास्त आणि यांत्रिक शक्तिचा वापर केला जात नसेल तर 20 किंवा त्याहून अधिक कामगार (श्रमिक) कार्यरत असले तरच त्या परिसरात कारखाना म्हटले जाते व कारखाना अधिनियमातील प्रबंधाने त्या उत्पादन प्रक्रियेस लागू होतात.

Q.5 निर्माणी अधिनियमातील श्रमिकांच्या आरोग्यासबंधीच्या तरतूदींची चर्चा करा.

Ans ⇒ श्रमिकांच्या आरोग्यासंबंधी तरतूदी
(Provision Regarding Health of workers)

श्रमिकांच्या आरोग्यासंबंधी कारखाना अधिनियमातील खालील प्रावधाने आहेत —

(1) स्वच्छता

अ] कार्यखोल्यांचा आतील भाग जिने व आतील मार्गावरील धूळ व घाण दररोज स्वच्छ केली पाहिजे.

ब] आतील जमिन किंवा फरशी आठवड्यातून एकदा जंतुनाशकाचा उपयोग करून धुवून काढली पाहिजे.

क] जमिन किंवा फरशी ओली राहणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

ड] खोल्यांना आतून व बाहेरून दर 5 वर्षांनी रंग - सफेदी केली पाहिजे.

(2) गटारे

उत्पादन क्रियामुळे उत्पन्न

होणारी घाण व दूषित पाणी वाहून नेण्यासाठी नाल्या व गटारांची उत्तम व्यवस्था असली पाहिजे.

③ वायू संचालन व तापमान

कारखान्याच्या प्रत्येक खोलीत ताज्या व खेळत्या हवेसाठी भरपूर वायूसंचालनाची आणि आरोग्यदायक तापमान ठेवण्याची परिणामकारक व्यवस्था असली पाहिजे.

④ धूर आणि धूळ

उत्पादन प्रक्रियेमुळे आरोग्याला अपायकारक धूर किंवा धूळ उत्पन्न होत असेल तर सुवासा बरोबर विषारीधूर किंवा धूळ श्रमिकांच्या शासन जाणार नाही व असा धूर व धूळ खोलीत साचणार नाही. याची ~~परिणा०~~ परिणामकारक उपयोजना केली पाहिजे.

⑤ कृत्रिम आर्द्रता

ज्या कारखान्यातील आर्द्रता कृत्रिम रितीने वाढवावी लागते त्या ठिकाणी श्रमिकांच्या आरोग्यातील

Page No:-
Date :- / /

कोणत्याही प्रकारे हानी पोहचणार नाही यासाठी सर्व प्रकारची उपाययोजना केली पाहिजे.

⑥ अनावश्यक गर्दी

श्रमिकांच्या आरोग्याला हानिकारक गर्दीचा दाटी होऊ नये यासाठी पूर्वी बांधलेल्या कारखान्यात प्रत्येक श्रमिकासाठी 350 घनफूट व हा नियम लागू झाल्यावर बांधलेल्या हानिकारक इमारतीत प्रत्येक श्रमिकांसाठी 500 घनफूट जागा असली पाहिजे ही जागा मोजताना 14 फूटापेक्षा जास्त ऊँच भागाचा विचार केला जाणार नाही.

⑦ प्रकाश व्यवस्था

श्रमिकांच्या कारखान्यात सर्वत्र पुरेसा प्रकाश असला पाहिजे.

⑧ पिण्याचे व वापरण्याचे पाणी

श्रमिकांना पिण्यासाठी शुद्ध स्वच्छ व निर्जंतुक पाणी योग्य ठिकाणी उपलब्ध

Page No:- Date :- / /

केले पाहिजे. तसेच हात धुणे वा अन्य वापरासाठी पाण्याची व्यवस्था असली पाहिजे.

(९) संडास व मुतारी

पुरुष श्रमिक व स्त्री श्रमिकांसाठी स्वतंत्र संडास व मुतारी पुरेसा प्रमाणात असणे आवश्यक आहे. याप्रमाणे श्रमिकांच्या आरोग्या संबंधीच्या तरतूदी कायदयात करण्यात असून कारखाना मालकाकडून त्यांची पूर्तता होणे आवश्यक आहे. अन्यथा मालकास दंड करण्यात येतो.

Principal
Arts & Commerce College, Nagar, Nagpur-15